## महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ

हुतात्मा बाबू गेनू मुंबई गिरणी कामगार क्रीडा भवन, सेनापती बापट मार्ग,
एलफिन्स्टन, मुंबई ४०००१३
दूरध्वनी क्रमांकः२४३०६७१७/२४२२७७५८/४३२२६८००

जा.क्र.: मका/कार्यक्रम/२०१५-१६/ ७९    दिनांकः-२५/०१/२०१६

परिपत्रक

विषय :-राज्यस्तरीय"कामगार केसरी" व "कुमार केसरी "कुस्ती स्पर्धा -२०१५-१६ मुंबई

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या वतीने कामगार कल्याण निधी अधिनियम १९५३ अंतर्गत मंडळाकडे कामगार कल्याण निधी भरणाऱ्या कामगारासाठी **"कामगार केसरी"** व कामगार कुटुंबीयासाठी **"कुमार केसरी "** कुस्ती स्पर्धा **दिनांक २२ फेब्रुवारी २०१६ ते २४ फेब्रुवारी २०१६ या कालावधीत ललित कला भवन,ना.म.जोशी, मार्ग,मुंबई येथे** आयोजित करण्यात आलेली आहे. स्पर्धेचे नियम व अटी पुढिलप्रमाणे-

१) मंडळाची कुस्ती स्पर्धा महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेच्या नियमाप्रमाणे व मुंबई शहर तालीम संघाच्या सहकार्याने होतील.

२) सदर स्पर्धा मॅटवर घेण्यात येईल.

३) स्पर्धा बाद पद्धतीने घेण्यात येतील.

४) पंचाचा निर्णय अंतीम राहील.

५) कामगार केसरी स्पर्धेतील स्पर्धक हा स्वतः कामगार असावा आणि तो ज्या अस्थापना / व्यवस्थापनेत काम करत असेल त्या आस्थापना / व्यवस्थापनेकडुन तो स्वतः कामगार असल्याचे प्रमाणपत्र (सर्टिफीकेट )त्याला सादर करावे लागेल.तसेच त्यांनी स्पर्धे करीता येतांना आस्थापनेने दिलेले स्वतःचे ओळखपत्र आणावे त्या शिवाय त्यांना प्रवास खर्च व दैनिक भत्ता दिला जाणार नाही.

६) कुमार केसरी स्पर्धेतील स्पर्धक कामगारांवर अवलंबुन असेल तर त्याला पालकांची माहे जून/डिसेंबर २०१५ ची वेतन पावती/व्यवस्थापनेचा दाखला (**कामगार कल्याण निधी कपात उल्लेख असलेला**) तसेच रेशन कार्डची सांक्षाकीत प्रत सोबत जोडावी.

७) स्पर्धेमधील कुस्त्या मॅट वर होणार असल्याने स्पर्धकांनी नियमाप्रमाणे पायामध्ये रेसलिंग शुज / कॉफी शुज घातले पाहिजेत. तसेच स्पर्धकास कॉसच्युम वापरणे बंधनकारक राहील. अन्यथा स्पर्धकाला स्पर्धेत सहभाग दिला जाणार नाही.

८) स्पर्धेत भाग घेणाऱ्या पहिलवानाने स्वेच्छेने आणि स्वतःच्या जबाबदारीवर भाग घ्यावा.

९) कामगार केसरी व कुमार केसरी गटात खेळणारा स्पर्धक वजनी गटात खेळु शकणार नाही.

१०) कामगार केसरी/कुमार केसरी आणि वजनी गटातील कुस्तीसाठी आपले निवडक खेळाडूंचे प्रवेश अर्ज पाठविताना संबंधित आस्थापनेने त्यांच्या प्राधिकृत अधिका-यांच्या सही व शिक्क्यासह आस्थापनेच्या लेटर पॅडवर खेळाडुंच्या नावाचा स्पष्ट उल्लेख करणे आवश्यक आहे. अथवा प्रवेशिका स्विकारली जाणार नाही. प्रवेशिका दिलेल्या मुदतीत सादर करावी.

११) मुंबई वगळता बाहेरील कामगार स्पर्धक व कामगार कुटुंबीय स्पर्धक पहिलवानांना नियमाप्रमाणे प्रतिदिनी रु.१००/- प्रमाणे दैनिक भत्ता (भोजन भत्ता) दिला जाईल. तसेच स्पर्धकास कमीत कमी दराचा रेल्वे / एस.टी.चा परतीसह प्रवासखर्च स्पर्धेच्या ठिकाणी दिला जाईल. त्याकरीता त्यांनी तिकिटे दिली पाहिजे. तिकिट असणे बंधनकारक राहिल. त्याशिवाय प्रवास खर्च दिला जाणार नाही.

१२) कुमार केसरी गटात भाग घेणाऱ्या पहिलवानांचे वय १८ वर्षे किंवा त्यापेक्षा कमी आणि वजन ५५ किलो पर्यंत असावे.

१३) कामगार केसरी गटात भाग घेणाऱ्या पहिलवानाचे वजन कमीत कमी ७५ किलो पेक्षा कमी आणि ८५ किलो पेक्षा जास्त असू नये. त्यापेक्षा जास्त वजन असलेल्या पहिलवानास स्पर्धेत प्रवेश दिला जाणार नाही. तसेच त्याला प्रवासखर्च व दैनिक भत्ता दिला जाणार नाही.

१४) खुल्या गटाची स्पर्धा ही पाच वजनी गटात घेण्यात येईल.

..........२

१५) या स्पर्धेसाठी जे स्पर्धक सहभागी होतील त्यांच्याकडुन प्रवेश अर्ज भरुन घ्यावेत. प्रवेश अर्जाचा नमुना सोबत जोडण्यात येत आहे. त्यानुसार आपल्या स्तरावर प्रवेश अर्ज स्पर्धकांना उपलब्ध करुन द्यावेत.

१६) स्पर्धेत भाग घेणाऱ्या विजेत्या पैलवानांना पुढिलप्रमाणे रोख रक्कमेची बक्षीसे आणि प्रशस्तीपत्र देण्यात येतील.

| बक्षिस | कुमार केसरी (५५ किलो पर्यंत) | कामगार केसरी (७५ते८५किलो पर्यंत) |
|---|---|---|
| प्रथम | रु.१५,०००/- | रु.२१,०००/- |
| द्वितीय | रु.७,५००/- | रु.१५,०००/- |
| तृतीय | रु.५,०००/- | रु.१०,०००/- |
| उत्तेजनार्थ | रु.२,५००/- | रु.५,०००/- |
| एकुण रक्कम | रु.३०,०००/- | रु.५१,०००/- |

**खुला गट**

| गट क्रमांक | प्रथम | द्वितीय | तृतीय | चतुर्थ | एकुण |
|---|---|---|---|---|---|
| गट १ ला ५७ किलो पर्यंत | १,०००/- | ७,५००/- | ५००/- | ३००/- | २,५००/- |
| गट २ रा ६१ कि. पर्यंत | १,२००/- | १,०००/- | ७५०/- | ५००/- | ३,४५०/- |
| गट ३ रा ६५ कि. पर्यंत | १,५००/- | १,२००/- | १,०००/- | ७५०/- | ४,४५०/- |
| गट ४ था ७० कि. पर्यंत | १,७००/- | १,५००/- | १,२००/- | १,०००/- | ५,४००/- |
| गट ५वा ७४ कि. पर्यंत | २,०००/- | १,७००/- | १,५००/- | १,२००/- | ६,४००/- |

१७) या स्पर्धेत प्रवेश घेणाऱ्या पहिलवानांची वजने **रविवार दि. २१ फेब्रुवारी २०१६** रोजी सकाळी १०.०० ते सांय ६.०० वाजे पर्यंत आणि **सोमवार दि. २२ फेब्रुवारी २०१६** रोजी सकाळी १०.०० ते १२.०० वाजेपर्यंत घेण्यात येतील.

स्पर्धेच्या सर्व प्रवेशिका ह्या **दि. १८ फेब्रुवारी २०१६** पर्यंत **सहाय्यक कल्याण आयुक्त, विभागीय कार्यालय, ललित कला भवन,गोविंदजी केणी रोड,नायगांव,मुंबई-१४ येथील** कार्यालयात पोस्टाद्वारे अथवा ई-मेल द्वारे पाठवावेत. अधिक माहितीसाठी **०२२-२४१२१३२५** या क्रमांकावर संपर्क साधावा. तसेच मध्यवर्ती कार्यालयातील कार्यक्रम शाखेचा दुरध्वनी क्रमांक **०२२-४३२२६८१७** वर संपर्क साधावा. बाहेरगावच्या पहिलवानांची निवास व्यवस्थाचे ठिकाण स्वंतत्र पत्राने कळविण्यात येईल.

उपरोक्त तपशिलाप्रमाणे मंडळाच्या राज्यस्तरीय कामगार केसरी / कुमार केसरी व खुल्या गटातील कुस्ती स्पर्धेत जास्तीत जास्त पहिलवानांनी भाग घ्यावा यासाठी मंडळाच्या सर्व विभाग व गट तसेच केंद्र प्रमुखांनी प्रयत्न करावेत. यासाठी सर्व विभाग / गट अधिकाऱ्यांनी आपल्या कार्यकक्षेत येणाऱ्या सर्व औद्योगिक व व्यावसायिक कारखान्यांना तसेच साखर कारखान्यांना प्रत्यक्ष भेटी देऊन जास्तीत जास्त स्पर्धक पहिलवान स्पर्धेकरीता पाठवीणे आवश्यक आहे.

स्पर्धेक मिळविण्याकरीता केलेल्या भेटीचा माहिती या कार्यालयास सादर करावी.जे अधिकारी/कर्मचारी स्पर्धेकरीता स्पर्धेक पाठविणार नाहीत त्यांच्या विरुध्द कडक कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सोबत :- प्रवेश अर्ज

कल्याण आयुक्त

प्रत :-

१) लेखा व लेखा परिक्षा अधिकारी, म.का.मुंबई
२) लेखा अधिकारी /लेखा परिक्षा अधिकारी, म.का.मुंबई
३) प्रसिध्दि व जनसंपर्क विभाग,म.का.मुंबई
४) सर्व विभाग प्रमुख,सर्व विभागीय कार्यालये
५) सर्व सहाय्यक लेखा अधिकारी, सर्व विभागीय कार्यालये
६) कामगार विकास अधिकारी,कामगार कल्याण भवन,नागपूर/पूणे
७) सर्व गट प्रमुख ,सर्व गट कार्यालये.
८) सर्व केंद्र प्रमुख,सर्व कामगार कल्याण केंद्र
९) सर्व समिती पध्दतीवरील साखर कारखाने